# कार्यालय नगर परिषद वरणगांव जि.जळगांव

**मुख्याधिकारी नगर परिषद वरणगांव यांच्या वतीने सन २०२६-२७ करीता खालील नमुद कामाकरिता वार्षिक ई-निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र | कामाचे विवरण | निविदे सोबत भरावयाची सुरक्षा अनामत (ऑनलाईन पद्धतीने)रक्कम | निविदा प्रपत्राची किंमत (ऑनलाईन पद्धतीने) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | ब्लिचिंग पावडर ग्रेड १ चे २५ किलो ची बाग आवश्यकतेनुसार पुरवठा करणे | १०००० रु. | १००० रु. | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| २ | तुरटी (ALUM Grade-I) प्रती मे .टन | | | |

**ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | दिनांक १५/०५/२०२६ दुपारी५.०० वाजता |
| ई-निविदा व दस्तावेज डाउनलोड दिनांक | दिनांक १५/०५/२०२६ दुपारी५.०० वाजता पासून ते दिनांक २२/०५/२०२६ सांय ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा व दास्तावेज दाखल करण्याचा दिनांक | दिनांक १५/०५/२०२६ दुपारी १.०० वाजता पासून ते दिनांक २२/०५/२०२६ सांय ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | शक्य झाल्यास दिनांक २५/०५/२०२६ सकाळी ११.०० वाजता |

## कार्यालय नगर परिषद वरणगांव जि.जळगांव
## ई-निविदा सुचना संबधी अटी व शर्ती

1. सर्व निविदा प्रक्रिया ऑनलाईन असून निविदा संबधी सुचना निविदा प्रसिध्द झाल्यांतर http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.
2. निविदा संबधित कागदपत्रे http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.
3. सर्व माल हा (ब्लीचीन पावडर व तुरटी) ISI मार्क व ग्रेड १ चा असणे आवश्यक आहे तसेच ब्लेचींग पावडर ३३% क्लोरीन युक्त असणे आवश्यक आहे.

4. वरील प्रमाणे ब्लीचीन पावडर व तुरटी पुरवठा केल्यानंतर सोबत मा. जिल्हा अनुजीव शास्त्रज्ञ यांचे तपासणी झालेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.सदर प्रमाणपत्र मुद्दा क्र ३ नुसार असणे आवश्यक आहे अन्यथा देयक प्रदान करता येणार नाही.

5. वरिल कामाबाबत निधिचे उपलब्धते नुसार पार पाडलेल्या कामाचे भुगतान करण्यात येइल. ह्या कारणामुळे झालेल्या विलंबनाबाबत कोणत्याही प्रकारचा व्याज् वा दावा ऐकल्या जाणार नाही.

6. निविदा दर मंजूर झाल्यानंतर दिनांक ३१/३/२०२७ पावेतो कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

7. निविदा दर मंजूर झाल्यानंतर ५०० रुपयाच्या स्टँप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

8. निविदा धारकास अनामत रक्कम व निविदा प्रपत्र फी फक्त ऑनलाईन स्वरूपात भरता येईल.

9. कंत्राटदाराच्या देयकातुन 10% सुरक्षा राशी व नियमानुसार आयकर चार्ज कंत्राटकर पोटी भरावयाची शुल्क कपात करण्यात येइल. व कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम सदर कामाचा कालावधी पुर्ण झाल्यावर अदा करण्यात येईल.

10. सदर पुरवठा न.प.च्या शर्ती व अटींच्या अधीन राहून करावा लागेल.तसेच लेखापरीक्षणात आक्षेप किंवा रिकव्हरी निघाल्यास ती भरून द्यावी लागेल.

11. निविदाधारक हे ब्लिचिंग पावडर व तुरटीचे अधिकृत पुरवठा धारक / विक्रेता असावे लागेल.

12. वरील कामाकरीता निविदा धारकाकडे अनुभवी पुरवठा बाबतचे चे पंजीकत लायसन्स असणे आवश्यक आहे.

13. आदेश दिल्यानंतर 3 दिवसाच्या आत पुरवठा करावा लागेल.

14. महाराष्ट्र शासन अंतर्गत नगर परिषदे कडील पुरवठाधारक यांच्याकडे योग्य त्या वर्गातील वैध नोंदणी प्रमाणपत्राची मुळ प्रत/आयकर नोंदणी व भरणा प्रमाणपत्र , पॅनकार्ड,जी.एस.टी.प्रमाणपत्र स्कॅन करुन अपलोड करावी लागेल.

15. आपण यापूर्वी केलेल्या कामाबाबत आदेश अपलोड करावा लागेल

16. निविदा प्रपत्रातील Decelaration of the contractor विहित नमुन्यातील (APPENDIX-A) कंत्राटदाराने स्कॅनप्रत अपलोड करावी लागेल.

17. निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटिस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

18. कंत्राटदारास निविदा ऑनलाईन वेळापत्रकानुसार http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर सादर करता येतील.

19. सदर अटी व शर्ती मधील नमुद केलेल्या कागदपत्राच्या स्कॅन केलेल्या प्रती PDF फॉर्म मधे लिफाफा क्र.०१ (technical/fee/qualification details) मधे सादर करणे आवश्यक

आहे.तसेच अटी व शर्तीची पुर्तता करुन लिफाफा क्र.०२ (financial details) मधे BOQ (schedule B) .xls file करुन अपलोड करावी लागेल.

20. तांत्रिक कागदपत्राची पूर्तता केल्यानंतरच वित्तीय लिफाफा उघडण्यात येईल.

21. कंत्राटदाराचे देयकामधुन नियमाप्रमाणे शासकीय कपाती कपात करण्यात येतील.

22. कोणतीही निविदा कारण न दाखविता स्वीकारण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद वरणगांव यांनी राखून ठेवलेले आहेत.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरणगांव

**परिशिष्ट - अ**

**प्रतिज्ञा पत्र (५००/-) stamp paper**

मी/आम्ही याब्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१)(ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहे. आणि गंभिरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्यावतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही कोणताही हिस्सा किंवा हितसंबध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

**कलम १६ (१) (आय):-** यापुढे तरतुद केली असेल त्याव्यतिरीक्त, नगरपालिकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेव्यक्तीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वत:चा किंवा आपल्या भागिदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबध असेल.

**कलम ४४ (१) (ब) :-** पालिका सदस्य म्हणुन किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट कलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन uकेल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबध असेल- मग अशा हिश्श्याची किंवा हितसंबधाची किंमत काहीही असो, किंवा जीत अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तिंच्यावतीने व्यावसायिकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदाधारकांचे नांव :-------------------------------------

पत्ता :- ----------------------------------------------- निविदाधारकाची सही

दिनांक :-

साक्षिदाराचे नांव :- --------------------------------------

पत्ता :- ----------------------------------------------- साक्षिदाराची सही

दिनांक :-

Signature Not Verified

Digitally signed by DNYANESHWAR TULSHIRAM PAWAR
Date: 2026.05.15 15:44:22 IST
Location: Maharashtra-MH